जिल्हाधिकारी कार्यालय (महसूल) वाशिम
रुम नं. ११५, प्रशासकीय इमारत, काटा रोड, वाशिम
दुरध्वनी क्रमांक ०७२५२ २३४५०८ फॅक्स नं. ०७२५२ २३२८५८
rdc_washim@rediffmail.com

आगाऊ ताबा
आदेश

क्र.कक्ष-४/क.लि.-२(महसूल)/कावि- ५५६/२०१८
दिनांक - १२/०९/२०१८.

प्रति,
तहसीलदार, वाशिम

विषय - प्रकरण क्रमांक रामाक्र.एलएनडी-१२/वाशिम/०१/२०१७-१८.
कसबे वाशिम ता.जि.वाशिम येथील स.नं. ४०४ मधील क्षेत्रफळ ०३.६७ हे.आर. जमिन नविन केंद्रिय विद्यालयाच्या इमारत बांधकाम व अधिकारी/कर्मचारी यांच्या निवासस्थानाकरीता आगाऊ ताबा देणेबाबत.

संदर्भ -
१) सहायक आयुक्त, केंद्रिय विद्यालय संगठण, नवि दिल्ली यांचे पत्र दिनांक २०/०१/२०१७.
२) सहायक आयुक्त, केंद्रिय विद्यालय संगठण, मुंबई यांचे पत्र दिनांक २४/०१/२०१७.
३) प्राचार्य, केंद्रिय विद्यालय, आयुध निर्माणी, वरणगाव, जळगाव यांचे पत्र दिनांक १७/०७/२०१७.
४) तहसिलदार वाशिम व उपविभागीय अधिकारी वाशिम यांचा अहवाल दिनांक १२/०९/२०१८.

आवेदक, सहायक आयुक्त केंद्रिय विद्यालय संगठण नवि दिल्ली सहायक आयुक्त केंद्रिय विद्यालय संगठण मुंबई व प्राचार्य, केंद्रिय विद्यालय, आयुध निर्माणी, वरणगाव, जळगाव यांनी त्यांचेउपरोक्त संदर्भीय पत्रानुसार वाशिम जिल्हयात नविन केंद्रिय विद्यालयाच्या इमारत बांधकाम व अधिकारी/कर्मचारी यांच्या निवासस्थानाकरीता कसबे वाशिम ता.जि.वाशिम येथील स.नं. ४०४ मधील क्षेत्रफळ ०३.६७ हे.आर. जमिन उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केल्यावरुन प्रस्तुत प्रकरण अहवालासह तहसिलदार वाशिम व उपविभागीय अधिकारी वाशिम यांचेकडुन या कार्यालयास प्राप्त झाले.

प्रकरणात तहसिलदार वाशिम वउपविभागीय अधिकारी वाशिम यांनी अहवाल सादर करुन प्रकरण या कार्यालयास सादर केले.

प्रकरणात आवेकदकाचा जागा मागणी बाबतचे पत्र, तहसिलदार वाशिम व उपविभागीय अधिकारी वाशिम यांचा अहवाल, ७/१२, जाहिरनामा, प्रसिध्दी अहवाल, सहायक संचालक नगर रचना विभाग वाशिम यांचे पत्र, उपअधिक्षक भुमि अभिलेख वाशिम यांनी सादर केलेली मोजनी शिट, इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय (महसूल) वाशिम
रुम नं. ११५, प्रशासकीय इमारत, काटा रोड, वाशिम
दुरध्वनी क्रमांक ०७२५२ २३४५०८ फॅक्स नं. ०७२५२ २३२८५८
rdc_washim@rediffmail.com

---

प्रकरणात तहसिलदार, वाशिम यांनी दिनांक ०२/०८/२०१७ रोजी जाहिरनामा काढुन आक्षेप/हरकती मागविल्यात. मुदतीचे आत तसेच आजपावेतो कोणीही आक्षेप/हरकत दाखल नाहीत. तलाठी वाशिम यांचा प्रसिध्दी अहवाल व जाहिरनाम्याची प्रत प्रकरणात संलग्न केली आली आहे.

प्रकरणात मागणी केलेल्या जमीनीची उपअधिक्षक भुमि अभिलेख, वाशिम यांनी दिनांक २८/११/२०१७ रोजी मोजणी करुन मोजणी नकाशानुसार प्रत्यक्ष जागेवर क्षेत्र ०३.६७ हे.आर. आढळुण आले आहे. मोजणी शिटची प्रत प्रकरणात सादर केली आहे.

प्रकरणात सहायक संचालक नगर रचना विभाग वाशिम यांचे पत्र जा.क्र./जागा मागणी/वाशिम/ता.वाशिम/ससंनरवा/८४१, दिनांक ०६/१०/२०१७ नुसार त्यांनी अर्जदार संस्थेस स्थळदर्शक नकाशानुसार वाशिम शहराच्या मंजुर योजना नुसार सार्वजनिक/निमसार्वजनिक या वापरापैकि आहे. विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुद क्रमांक २२.६ (iv) नुसार सदर विभागास शासकिय अधिकारी/कर्मचारी निवासस्थानाचा बांधकाम वापर अनुज्ञेय आहे. याबाबत तहसिलदार वाशिम यांनी सहायक संचालक नगर रचना विभाग वाशिम यांचेकडुन सुधारीत अहवाल प्राप्त करुन घ्यावा.

प्रकरणात कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग वाशिम यांनी त्यांचे पत्र जावक क्र : ७२०६/चिशा/२०१८ दिनांक १२/०९/२०१८ नुसार उपविभागीय अभियंता, सां.बा. अविभाग, वाशिम यांनी सदर जागेची प्रत्यक्ष पाहणी केली असता त्यांचे पाहणी अहवालानुसार सदर जागेमध्ये कोणताही सा.बां. विभागाचा रस्ता जात नाही किंवा इमारत प्रस्तावित नाही. करीता सदर जागा केंद्रीय विदयालय व अधिकारी व कर्मचारी यांचे निवास्थान बांधकामाकरीता देण्यास त्यांचे विभागाची हरकत नाही असे त्यांनी त्यांच्या पत्रात नमुद केले आहे.

प्रकरणात वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) वाशिम संरक्षक यांनी उपवनसंरक्षण यांना दाखल केलेल्या नाहरकत पत्राची प्रत या कार्यालयास त्यांचे पत्र क्र.वपअप्रा/५७४/२०१८-१९ दिनांक ११/०९/२०१८ नुसार प्राप्त झाले असुन त्यरंनी सदरचे क्षेत्र हे वाशिम वनपरिक्षेच्या ताब्यात नसुन वनसदृषय जमीनीत मोडत नसल्याचे कळविले आहे.

प्रकरणात उपविभागीय अधिकारी वाशिम व तहसिलदार, वाशिम यांनी अहवाल सादर करुन, शासन निर्णय दिनांक १३ एप्रिल २०१६, शासन निर्णय क्रमांक-जमिन-२०१५/ प्र.क्र.४५/ज-१, दिनांक १ जुन, २०१५, शासन निर्णय क्रमांक जमिन ०५/ २०११/प्र.क्र.९०/ज-१ दिनांक २७ जुलै, २०११, मंत्रीमंडळ निर्णय ९ फेब्रुवारी,२०१६, शासन राजपत्र असाधारण भाग ४ ब अधिसुचना क्रमांक जमीन-२०१५/प्र.क्र.५५/ज-१,दिनांक ३१/१२/ २०१५, महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम १९७१, मधील नियम ६, ७ व ५० मध्ये दुरुस्तीबाबत शासन राजपत्रातील अधिसुचना, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २०, २२ इत्यादी तरतुदीनुसार आवेदक सहायक आयुक्त, केंद्रिय विद्यालय संगठण, मुंबई

जिल्हाधिकारी कार्यालय (महसूल) वाशिम
रुम नं. ११५, प्रशासकीय इमारत, काटा रोड, वाशिम
दुरध्वनी क्रमांक ०७२५२ २३४५०८ फॅक्स नं. ०७२५२ २३२८५८
rdc_washim@rediffmail.com

---

यांचेतर्फे प्राचार्य, केंद्रिय विद्यालय, आयुध निर्माणी, वरणगाव, जळगाव यांना, कसबे वाशिम ता.जि.वाशिम येथील स.नं. ४०४ मधील क्षेत्रफळ ०३.६७ हे.आर. जमिन नविन केंद्रिय विद्यालयाच्या इमारत बांधकाम व अधिकारी/कर्मचारी यांच्या निवासस्थानाकरीता आगाऊ ताबा देण्यास हरकत नसल्याबाबतचा अहवाल सादर केला आहे.

प्रकरणातील अभिप्राय,उपविभागीय अधिकारी वाशिम व तहसिलदार, वाशिम यांचे प्रस्ताव इत्यार्दीस अधिन राहून, तसेच शासन निर्णय दिनांक ११ एप्रिल २०१६, शासन निर्णय क्रमांक-जमिन-२०१५/ प्र.क्र.४५/ज-१, दिनांक १ जुन, २०१५, शासन निर्णय क्रमांक जमिन ०५/ २०११/प्र.क्र.९०/ज-१ दिनांक २७ जुलै, २०११, मंत्रीमंडळ निर्णय ९ फेब्रुवारी.२०१६, शासन राजपत्र असाधारण भाग ४ ब अधिसुचना क्रमांक जमीन-२०१५/प्र.क्र.५५/ज-१,दिनांक ३१/१२/ २०१५, महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम १९७१, मधील नियम ६, ७ व ५० मध्ये दुरुस्तीबाबत शासन राजपत्रातील अधिसुचना, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २०, २२ इत्यादी तरतुदीनुसार, आवेदक सहायक आयुक्त, केंद्रिय विद्यालय संगठण, मुंबई यांचेतर्फे प्राचार्य, केंद्रिय विद्यालय, आयुध निर्माणी, वरणगाव, जळगाव यांना, नविन केंद्रिय विद्यालयाच्या इमारत बांधकाम व अधिकारी/कर्मचारी यांच्या निवासस्थाना करीता कसबे वाशिम ता.जि.वाशिम येथील स.नं. ४०४ मधील क्षेत्रफळ ०३.६७ हे. आर. जमिनीचा आगाऊ ताबा खालील अतिरीक्त अटि व शर्तीवर मंजुर करीत आहे.

<u>अटी व शर्ती -</u>

१) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ व महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम (शासकिय जमिनींची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ मधील तरतुदी लागु राहतील.
२) उपरोक्त जमिन ज्या प्रयोजनाकरीता मंजुर केली आहे त्याच प्रयोजनाकरीता वापर करावा. सदर जमिन विक्री/गहाण/भाडेतत्वावर दुस-या संस्थेस/कंपनीस/व्यक्तिस देता येणार नाही.
३) जमिनीचे संरक्षण, देखभाल करण्याची जबाबदारी संबंधीत विभागाची राहील.
४) सदर जमीन किंवा जमीनीचा कोणताही भाग शासनाच्या महसूल व वा विभागाच्या पुर्वपरवानगी शिवाय हस्तांतरीत/गहाण/बक्षीसपत्र/तारण ठेवता येणार नाही.
५) जमिनीवर बांधकाम करतांना स्थानिक विकास नियमावली नुसार स्थानिक प्राधिकरणाच्या पुर्व मंजुरीनंतर बांधकाम करण्यात यावे. तथापि, विकास नियमावलीतील काहीही तरतुद असली तरी, असे बांधकाम फक्त, ज्या प्रयोजनासाठी जमीन मंजुर करण्यात आलेली आहे. अशा प्रयोजनासाठीच करावे.
६) जमीनीवर अतिक्रमण होणार नाही याची खबरदारी आवेदक विभागाने घ्यावी.
७) लगतच्या भुखंडधारकांचे सुविधाधिकार बाधित होणार नाहीत, याची आवेदक विभागाने दक्षता घ्यावी.
८) प्रस्तुत जमीनीच्या चारही बाजुस दिर्घ आयुमर्यादेच्या वृक्षांची यथायोग्य प्रमाणात लागवड व संगोपन करावे.

जिल्हाधिकारी कार्यालय (महसूल) वाशिम
रुम नं. ११५, प्रशासकीय इमारत, काटा रोड, वाशिम
दुरध्वनी क्रमांक ०७२५२ २३४५०८ फॅक्स नं. ०७२५२ २३२८५८
rdc_washim@rediffmail.com

---

९) जमीनीची आवश्यकता नसल्यास सदर जमीन महसूल विभागाला परत करावी लागेल.

१०) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व त्याअंतर्गत नियमातील सर्व तरतुदी आवेदक विभागास बंधनकारक राहतील.

११) शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या नियमांचे तसेच आदेशाचे आणि उक्त अटी व शर्तीचे पालन करणे आवेदक विभागावर बंधनकारक राहील.

१२) प्रस्तावित जमीनीचा वापर मंजुर प्रयोजनासाठी २ वर्षांचे आतमध्ये करावा अन्यथा जमीन शासन जमा करण्यात येईल.

१३) वरिल कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास जमीनीवर अस्तीत्वात असलेल्या सर्व मालमत्तेसह शासनास जमा करण्यात येईल व याबाबतची कोणतीही नुकसान भरपाई आवेदक विभागास मिळणार नाही.

१४) अविभागीय अधिकरी वाशिम व तहसिलदार वाशिम यांनी प्रकरणात आवश्यक त्या सर्व यंत्रणेचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊन प्रकरण अंतिम मंजुरीकरीता या कार्यालयास सादर करावे.

१५) वरील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास जमिन शासनजमा करण्यात येईल.

स्वा/-
( लक्ष्मीनारायण मिश्रा )
जिल्हाधिकारी, वाशिम.

प्रतिलिपी -
१) उपविभागीय अधिकारी, वाशिम
२) सहायक आयुक्त, केंद्रिय विद्यालय संगठण, आय आय टि परीसर, मुंबई - ७६ यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) प्राचार्य, केंद्रिय विद्यालय, आयुध निर्माणी, वरणगाव, जळगाव यांना माहिती व उचित कार्यवाहि करीता अग्रेषीत त्यांनी प्रश्नाधिन जमिनीचा ताबा तहसिल्दार वाशिम यांचेकडुन घ्यावा.
४) उपअधिक्षक भुमि अभिलेख वाशिम यांना माहिती तथा उचित कार्यवाहीकरीता अग्रेषीत. आपण उपरोक्त आदेशानुसार अभिलेख दुरुस्ती करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
५) मंडळ अधिकारी, वाशिम
६) तलाठी, वाशिम भाग - ३
७) निवड नस्ती.

*(मुळ प्रत मा.जिल्हाधिकारी द्वारा स्वाक्षरीत)*

जिल्हाधिकारी वाशिम
करीता

# -: ताबा पावती :-

ताबा पावती लिहुन घेणार :- प्राचार्य, केंद्रीय विद्यालय, आयुध निर्माणी वरणगांव, ता.भुसावळ जि. जळगांव

ताबे पावती लिहुन देणार :- शासनातर्फे, मंडळ अधिकारी वाशिम.

आम्ही खालील सही करणार ताबा पावती लिहुन देतो की, मा. जिल्हाधिकारी वाशिम यांचे आदेश क्र. कक्ष-४/क.लि.-२ (महसूल)/कावी- ५५६/२०१८, पारीत दिनांक १२ /०९/२०१८ नुसार कसबे वाशिम भाग-३ मधील सर्व्हे नं.४०४ मधील क्षेत्र ३.६७ हे.आर जमीनीचा ताबा मोक्यावर दिला.

चतुसिमा :-

पुर्वेस :- वाशिम ते चिखली खुर्द डांबरी रस्ता.

पश्चीम :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजीक न्याय भवन, वाशिम यांची इमारत व वाशिम ते चिखली बु. रोड

उत्तर :- नालंदा नगर

दक्षीण :- डांबरी रस्ता व त्यालगत शासकिय निवासस्थाने.

वरील प्रमाणे चतुसिमा असलेली जागा आज दिनांक १२/०९/२०१८ रोजी ताब्यात देण्यात आली. करीता ताबा पावती लिहुन दिली.

ठिकाण :- वाशिम

दिनांक :- १२ /०९ /२०१८.

12.9.18

१) ताबा घेणाऱ्याची सही :- ------------------------------
Kendriya Vidyalaya / केन्द्रीय विद्यालय
O. F. Varangaon / आ नि. वरणगांव

12/9/2018

२) ताबा देणाऱ्याची सही :- ------------------------------
(आर. जी. गरपाळ)
मंडळ अधिकारी, वाशिम